## शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क्र.dydepune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र. शिउसं/पुवि/उमाशि-३/११ वी ऑ.प्र.प्र २०१४-१५/ दि. - 6 FEB 2014 २०१४

प्रति,

सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक,

(कनिष्ठ महाविद्यालये, पुणे व

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील,) पुणे .

**विषयः- शैक्षणिक वर्ष सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वीचे प्रवेश केद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे प्रवेश गेली १८ वर्षे केंद्रिय प्रवेश ऑफलाईन पध्दतीने होत आहेत. शैक्षणिक वर्ष सन २०१४-१५ पासून इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करावयाचे असल्याने त्या अनुषंगाने खालील सूचना लक्षात घ्याव्यात.

१. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण नऊ झोनमध्ये विभागण्यात आलेले आहे. ते झोन पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| **१.पुणे शहर विभाग** | **२.कोथरुड, कर्वेनगर** | **३.स्वारगेट, पर्वती, धनकवडी** |
| **४.सिंहगड रोड** | **५.कॅम्प, येरवडा** | **६.हडपसर** |
| **७.शिवाजीनगर, औंध, पाषाण** | **८.पिंपरी, भोसरी** | **९.चिंचवड, निगडी** |

प्रत्येक झोनमध्ये समाविष्ट क्षेत्र निश्चित केले आहे. तद्नुसार आपले कनिष्ठ महाविद्यालय कोणत्या झोनमध्ये आहे ते पाहून योग्य झोनमध्ये असल्याची खात्री कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी करावी.

२. ऑनलाईन पद्धतीत आपण माध्यमिक शाळांचा सहभाग घेत आहोत. ऑनलाईन पध्दतीत विद्यार्थी प्रवेश अर्ज त्यांच्या इयत्ता १० वी च्या माध्यमिक शाळेतून भरतील. प्रवेश प्रक्रियेतील नऊ झोनसाठी असलेल्या **झोन समित्या** प्रशिक्षण व समन्वयाचे काम करतील.

३. विद्यार्थ्यांना शाखानिहाय कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती मिळण्यासाठी माहिती पुस्तिका देण्यात येईल. सदर माहिती पुस्तिका विद्यार्थ्यांना स्वतःच्या शाळेमध्ये मिळेल. सदर पुस्तिकेत कनिष्ठ महाविद्यालयांची सविस्तर माहिती, प्रवेश प्रक्रियेची माहिती, सामाजिक व विशेष आरक्षणासंबंधी माहिती असेल.

४. कनिष्ठ महाविद्यालयासाठी ऑन लाईन रजिस्ट्रेशन फॉर्म असेल. यामध्ये खालील बाबी असतील

१- कनिष्ठ महाविद्यालयाचे संपूर्ण नांव (शासनाकडे नोंदणीकृत असल्याप्रमाणे)

२- झोन क्रमांक

३- अल्पसंख्याक आहे का ?

४- माध्यमिक शाळा संलग्न आहे किंवा वरिष्ठ महाविद्यालय संलग्न

५- कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रकार(मुलांचे/मुलींचे/सहशिक्षण)

६- शाखा व माध्यम निहाय माहिती- यामध्ये शाखा, माध्यम,

७. अनुदानित/अंशतःअनुदानित/कायम विनाअनुदानित (फी तपशिलासह).

८. इ.११ वी वर्गातील एकूण प्रवेश क्षमता,

९. वैकल्पिक भाषा, वैकल्पिक विषय, द्विलक्षी अभ्यासक्रम व त्यांची प्रवेश क्षमता यांचा उल्लेख असेल.

५. विद्यार्थी अर्ज स्वतःच्या माध्यमिक शाळेतून किंवा इंटरनेट सुविधा असल्यास घरात बसून भरतील.

६. प्रवेश प्रक्रिये दरम्यान काही कनिष्ठ महाविद्यालये मार्गदर्शन केंद्र असतील, झोननिहाय मार्गदर्शन केंद्र पुढीलप्रमाणे- सोबत यादी जोडलेली आहे.

७. महाराष्ट्र बोर्डाव्यतिरिक्त अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यास मार्गदर्शन केंद्रे स्वतंत्र ठेवली जातील.

८. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने प्रवेश निश्चित केल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांचा प्रवेश अर्ज व माहितीपत्रक मिळून जास्तीत जास्त रु. ५०/- शुल्क आकारता येईल.प्रत्यक्ष प्रवेशाचे काम कनिष्ठ महाविद्यालयांनी करावयाचे असल्याने किमान तीन तज्ञ प्रशिक्षित असावेत. प्रवेशाची नोंद, रिसीट देणे, प्रवेश रद्द केल्यास नोंद इत्यादी कामे ऑनलाईन होणे अपेक्षित आहे.तसा लेखी सूचना संबंधितांना दयाव्यात.

**अध्यक्ष**

**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती**

**तथा शिक्षण उपसंचालक**

**पुणे विभाग, पुणे**